## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (प्रतिनिधी) : पदवीस्तरावर येत्या शैक्षणिक वर्षात लागू होणाऱ्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत जनजागृती व्हावी यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने ९ व १० जानेवारी २०२४ रोजी जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्हयातील ६२ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून अंदाजे १५ हजार विद्यार्थी व पालकांपर्यंत हे धोरण पोहचविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

गेल्या महिन्यात विद्यापीठाशी संलग्नित प्राचार्य, प्राधिकरणाचे सदस्य, संस्थाचालक यांच्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाबाबत विद्यापीठात कार्यशाळा घेण्यात आली होती. त्याचवेळी विद्यार्थी, पालक यांच्यापर्यंत या धोरणाची माहिती व्हावी यासाठी तीनही जिल्हयात कार्यशाळा घेण्यात येतील असे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी जाहीर केले होते. त्याचाच एक भाग म्हणून ९ व १० जानेवारी रोजी ही कार्यशाळा होणार आहे. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमधील १२ वी प्रवेशित विद्यार्थी, पदवी अंतीम वर्षातील विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना या कार्यशाळेसाठी पाचारण करण्यात आले आहे. जळगाव जिल्हयातील ३४, धुळे जिल्हयातील १९ आणि नंदुरबार जिल्हयातील ९ महाविद्यालयातील ९ व १० जानेवारी रोजी दोन सत्रांमध्ये या कार्यशाळा होणार आहेत. ज्या महाविद्यालयात या कार्यशाळा होणार आहेत. त्या महाविद्यालयाच्या परिसरातील इतर महाविद्यालयांना देखील आयोजक महाविद्यालयांच्या कार्यशाळे सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठाने २१ तज्ज्ञांची टिम तयार केली असून त्या त्या आयोजक महाविद्यालयांमध्ये जावून हे तज्ज्ञ पदवी स्तरावर नवीन शैक्षणिक धोरण कशा पध्दतीने लागू होणार आहे, ४ वर्षीय पदवी अभ्यासक्रम कसा असणार आहे यामधील मेजर आणि मायनर विषय म्हणजे काय आदी बाबत सविस्तर माहिती देवून शंकाचे निरसन करणार आहेत. विद्यापीठाच्या गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने या कार्यशाळा होत असल्याची माहिती कक्षाचे संचालक प्रा. समीर नारखेडे यांनी दिली. एका कार्यशाळेस १५० ते २० विद्यार्थी अपेक्षित आहे. जवळपास १५ हजार विद्यार्थ्यांपर्यंत दोन दिवसात हे धोरण पोहचविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

या संदर्भात कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेत मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञांची बैठक बुधवार दि. ३ जानेवारी रोजी विद्यापीठात बैठक घेण्यात आली. याबैठकीत कुलगुरू यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. जगदीश पाटील हे उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा कार्यपध्दतीची माहिती व्हावी यासाठी विविध विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींना विद्यापीठात बोलावून ही प्रक्रिया अवगत करून देण्यात आली.

विद्यापीठाने सर्व कामकाजात अधिक पारदर्शकता असावी या दृष्टीने विविध पावले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाच्या परीक्षांची निकाल प्रक्रिया कशी असते, उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग, तपासणी व अनुषंगिक कार्यपध्दतीची प्रक्रिया अवगत व्हावी यासाठी विद्यापीठाने प्रातिनिधीक स्वरूपात विविध विद्यार्थी

...२

## जनसंपर्क विभाग



संघटनांच्या प्रतिनिधींना विद्यापीठात पाचारण केले व त्यांना ही सर्व प्रक्रिया समजावून सांगितली. या प्रतिनिधींच्या शंकाचे देखील निरसन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील यांनी केले. यावेळी अजय सपकाळ, कुणाल पाटील, विरेंन्द्र तुरकाडे, वेद बारी, कल्पेश पवार, चेतन पवार आदी प्रतिनिधी उपस्थित होते. विद्यापीठाने या पध्दतीचा उपक्रम राबवून अनोखे पाऊल उचलले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव दि.३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिक शास्त्रीय प्रशाळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

सामाजिकशास्त्र प्रशाळेत प्रभारी संचालक डॉ. अजय पाटील यांनी मनोगत व्यक्त करतांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे जात- धर्म विहीन समाज व्यवस्था निर्माण करण्याचे स्वप्न आजच्या युवक युवतींनी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले. यावेळील प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. उमेश गोगडिया यांची उपस्थिती होती. सुकन्या जाधव हिने सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. विजय घोरपडे तर डॉ अभय मनसरे यांनी आभार मानले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात झालेल्या कार्यक्रमात सहायक अश्विनी पानपाटील यांच्या हस्ते प्रतिमापुजन करण्यात आले. यावेळी संचालक डॉ. अजय सुरवाडे, संदीप भदाणे, प्रा. राकेश गेडाम, भूषण पाटील व विद्यार्थी उपस्थित होते.

.................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३ जानेवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी